दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २२१ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.७ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीवर गुन्हा दाखल होणार?

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीवर गुन्हा दाखल होणार आहे. आज दिवसभर वादाच्या केंद्रस्थानी अजित पवार आणि त्यांचे सुपुत्र पार्थ पवार आहेत. पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क येथील ४० एकरांचा भूखंड विकत घेतल्यानंतर राजकीय आरोपांची राळ उठली. विरोधकांनी आरोप केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. दरम्यान आता या कंपनीवर गुन्हा दाखल केला जाणार आहे.

मे २०२५ मध्ये खरेदी खत नोंदवण्यात आलं आहे. जुना सातबारा देऊन व्यवहार करण्याचा प्रयत्न झाला आहे. तत्कालीन सबरजिस्ट्रार यांना निलंबित करण्यात येणार आहे. ज्यांनी शासनाची फसवणूक केली त्या सगळ्यांवर कारवाई केली जाणार आहे. ज्यांनी ज्यांनी शासनाची फसवणूक केली आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जाणार आहेत. अमेडिया कंपनीवर गुन्हा दाखल केला जाईल. खोटी कागदपत्रं जोडून खरेदी करण्यात आली आहे.

### नवी मुंबई गुन्हे शाखेची कौतुकास्पद कामगिरी

# ऑनलाईन गेमिंगद्वारे सायबर फसवणुक करणाऱ्या १२ गुन्हेगारांच्या टोळीला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यात सर्वत्र राष्ट्रीय सायबर सुरक्षा सप्ताह सुरु असून याच सप्ताहात प्रतिबंधित ऑनलाईन गेमिंग द्वारे फसवणूक करणारी टोळी नवी मुंबई पोलिसांनी उध्वस्त केली आहे. टोळीतील १२ जणांना अटक करण्यात आली आहे. संशयित आरोपींनी देशभरातील विविध बँकेच्या ८८६ खात्यांचा वापर केल्याचे निष्पन झाले आहे. शिवाय त्यांच्या विरोधात भारतातील एन.सी.सी.आर.पी. पोर्टलच्या एकुण ३९३ तक्रारी उघड झाले आहे. आरोपींनी आता पर्यंत ८३ कोटी ९७ लाख ४८ हजार २७८ रूपयांची फसवणुक झाल्याचे प्रथमदर्शी तपासात निष्पन्न झाले आहे.



इसाण उस्मानी मिनहाज शेख, हितेश पुनाराम देवांगन, सुनिल श्रवण देवांगन, तोमेशकुमार मोहीत उईके, राहुल राजु देवांगण, अंकीत रमेश सिंग, अभिषेक संजय सिंग, हरिषकुमार मदनलाल अर्पित संतेन्द्रकुमार सोनवाणी, रजत दिलीप शर्मा,लालबाबु राजेश्वर राम कुमार, कृष्णाअंशु अमित विश्वास, असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अवैध्यरित्या गेमिंग ॲप चालविणाऱ्या आरोपींना बँक खाती पुरवणारा आरोपी इसम इम्रान शेख हा सीबीडी रेल्वे स्टेशन येथे येणार असल्याची खात्रीशिर बातमी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार राहुल पवार यांना मिळाली होती. त्यांनी आरोपी इम्रान उस्मानी मिनहाज शेख (वय.२२, रा. नेरूळ) याला सीबीडी रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर ऑनलाईन गेमिंग फसवणूक केल्याचे कबूल केल्यावर त्याच्या विरोधात सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे येथे १४ ऑक्टोबरला गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी इम्रान उरुमानी मिनहाज शेख याने शासन मान्यता असणाऱ्या ऑनलाईन गेमिंग करीता बैंक खाते उघडुन दिल्यास काही रक्कम देण्याचे अमिष नवी मुंबई परिसरातील नागरिकांना दिले होते. तसेच आरोपीने नागरिकांना बँक खाते उघडण्यास लावुन बँकेचे पासबुक, एटीएम कार्ड, बँक खात्यास लिंक मोबाईल सिम कार्ड, धनादेश पुस्तिका, इत्यादीचे किट स्वत: कडे घेतले होते. हे किट आरोपी हा डोंबीवली येथे पाठवित असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या ठिकाणी पंच व तज्ञांच्या सहायाने मध्यवर्ती कक्ष पोलीस पथकाने धाड टाकली असता तेथे प्रतिबंधीत गेमींग व सायबर फसवणुकीचे ऑनलाईन प्रकार चालु असल्याचे दिसून आले. तेथील ऑनलाईन फसवणुक करीता असलेल्या साहित्यासह ५ आरोपींना पंचनामा कारवाई करून अटक करण्यात आलेली आहे.

गुन्हयातील अटक आरोपीकडे केलेल्या कौशल्यपुर्ण अधिक तपासानंतर अशाच प्रकारे ऑनलाईन सायबर फसवणूक व प्रतिबंधीत ऑनलाईन गेमिंग खेळविणारे इतर आरोपीत हे पुणावळे, पिंपरी चिंचवड येथे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर ठिकाणी देखील पंच व तज्ञांच्या सहायाने पोलीस पथकाने धाड टाकली असता तेथे प्रतिबंधीत गेमींग व सायबर फसवणुकीचे ऑनलाईन प्रकार चालु असल्याचे दिसून आले. तेथील ऑनलाईन फसवणुक करीता असलेल्या साहित्यासह ६ आरोपींना पंचनामा कारवाई करून १६ तारखेला रोजी अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीकडे असणारे लॅपटॉप व मोबाईल यांचा तांत्रिक तपास केला असता 1.www. Ramesh247.com, www.upl9.Pro.com आणि http://www.Reddybook.blue अशा ऑनलाईन प्रतिबंधीत गेमींग वेबसाईड/ऑपलिकेशन व ऑनलाईन सायबर फसवणुकीकरीता त्यांनी विविध बँकांच्या ८८६ खात्यांचा वापर केलेला असल्याचे निष्पन झाले आहे.

तसेच देशभरातील एन.सी.सी.आर.पी. पोर्टलवर दाखल ३९३ तकारीमध्ये शेअर मार्केटींग फॉर्ड, जॉब रॅकेटींग, वर्क फॉर्म होम, इत्यादी हेडचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. एन.सी.सी.आर.पी. पोर्टलवरील दाखल तकारीमध्ये नागरीकांची एकुण ८३ कोटी ९७ लाख ४८ हजार २७८ रूपयांची फसवणुक झाल्याचे प्रथमदर्शी तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, करीत आहेत. अटक संशयित आरोपी कडून ५२ मोबाईल फोन, ०७ लॅपटॉप, ९९ वेगवेगळ्या बँकांचे डेबिट कार्ड, ६४ वेगवेगळ्या बँकांचे धनादेश पुस्तिका १ टाटा सफारी कार असे एकुण १८ लाख ,५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

### भाजपकडून लोकनेते रामशेठ ठाकूर उत्तर रायगडचे निवडणूक प्रमुख

# आ.प्रशांत ठाकूर यांच्यावर रायगड जिल्ह्याची निवडणूक प्रभारी म्हणून जबाबदारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झालेले आहेत. सर्वात अगोदर नगरपरिषदा आणि नगरपालिकेसाठी पुढील महिन्यात मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर रायगडचे निवडणूक प्रमुख म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची आणि संपूर्ण रायगडचे निवडणूक प्रभारी म्हणून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची पक्षाने नियुक्ती केली आहे. निवडणूक व्यवस्थापनामध्ये त्यांचा हातखंडा असल्याने प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आ.ठाकूर यांच्यावर हि जबाबदारी सोपवली आहे.



कोरोना आणि त्यानंतर ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. परंतु जानेवारी महिन्यापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. त्यानुसार मंगळवारी महाराष्ट्र निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन नगरपरिषदा आणि नगरपालिका निवडणुकांची घोषणा केली. त्यानुसार

रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, मुरूड-जंजिरा, पेण, उरण, कर्जत, माथेरान, रोहा, श्रीवर्धन व महाड मध्ये नगरपालिकांसाठी मतदान होणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषद पंचायत समिती आणि पनवेल महानगरपालिकेची रणधुमाळी होणार आहे. दरम्यान मोठ्या प्रमाणात राजकीय स्थित्यंतरे झाल्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षांच्या आशा पल्लवी झाल्या आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्ष सुद्धा आघाडीवर आहे. या पक्षाची सर्वच तालुक्यांमध्ये ताकद वाढलेले आहे. रवींद्र चव्हाण यांच्याकडे रायगडचे पालकमंत्री पद होते. त्यामुळे या जिल्ह्यावर त्यांचे विशेष लक्ष आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला चांगले यश मिळावे या उद्देशाने त्यांनी आपले अत्यंत विश्वासू सहकारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर जिल्हा प्रभारी पदाची जबाबदारी सोपवली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे २००४ पासून निवडणूक व्यवस्थापनाचा मोठा अनुभव आहे. मायक्रो प्लॅनिंग मध्ये त्यांचा हातखंडा आहे. त्याचबरोबर आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम केले. त्यांनी आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवून दिली. पक्ष संघटना वाढीच्या दृष्टिकोनातून त्यांची कामगिरी उजवी ठरली. त्यांच्या कार्यकाळात भाजप रायगडमध्ये विस्तारला गेला. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जिल्हा प्रभारी म्हणून प्रदेशाध्यक्षांनी निवड केली आहे.

# अखेर माथेरान राणी पर्यटकांच्या सेवेस हजर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वानाच आतुरता असणाऱ्या माथेरान मिनिट्रेन अर्थातच माथेरानची महाराणी आज दि.६ रोजी मोठया दिमाखात माथेरान स्थानकात दाखल झाल्याने स्थानिकांसह पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही ट्रेन नेरळ स्थानकातून सकाळी ०८-५५ वा. सुटली आणि माथेरान स्थानकात ११-३५ वा पोहाचली. एकूण ७६ प्रवाशांनी या पहिल्या ट्रेनमधून प्रवास केला. या ट्रेनमध्ये ४०७ एनडीएम १ एचपी इंजिन लावण्यात आले असून एक विसडा डोम कोच अधिक एक जनरेटर कोच लावून ही ट्रेन चालविण्यात आली. या गाडीचे सारथ्य लोको पायलट (इंजिन ड्रायव्हर)

हरीश चिंचोले,मुकेश योगी यांनी केले तर गार्ड म्हणून एच. डी. मीना यांनी काम पाहिले. माथेरान स्थानकात महाराणीच्या स्वागतासाठी नागरिकांसह पर्यटकांनी गर्दी केली होती. मिनिट्रेन लवकरच सुरू व्हावी यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या ट्रेनच्या फेऱ्यात वाढ करण्यात यावी जेणेकरून सर्व पर्यटकांना याचा आनंद घेता येईल असे सर्व स्तरातून बोलले जात आहे.

# रोहा तालुक्यातील बाहे गावाच्या हद्दीत आढळले बिबट्याच्या पावलांचे ठसे

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावाच्या हद्दीत बिबट्याच्या पावलांचे ठसे उमटले असल्याचे आढळून आले आहे.

बुध.दि.५ रोजी बाहे गावाच्या हद्दीतील शेत जमिनीच्या भागात बिबट्याच्या पावलांचे ठसे उमटले असल्याचे येथील काही नागरिकांना आढळून आले. ज्यांनी ठसे पाहिले त्यांनी याबाबत दुसऱ्यांना सांगितले असता सदरील बातमी बघता बघता परिसरासह तालुक्यात पसरल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली व भीतीदायक वातावरण निर्माण झाले.सदरील बिबट्याच्या पावलांचे ठसे ही बातमी खरी आहे की निव्वळ अफवा आहे

याबाबत खातरजमा करण्यासाठी येथील जागरूक नागरिकांनी त्वरित वन विभागाशी व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड यांच्याशी संपर्क साधला असता दोन्ही टिमचे पथक बाहे गावाच्या हद्दीतमध्ये आले असता काही प्राण्यांच्या पावलांचे उमटलेले ठसे व बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळून आले.व अधिक माहितीनुसार सदरील ठसे हे बिबट्याच्या पावलांचे असल्याचे निदर्शनास आले व या भागात बिबट्या फिरत असल्याच्या वृत्ताला दुजोरा मिळाला आहे.



# रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे मध्य रेल्वे विस्कळीत

### ठाणे स्थानकात प्रवाशांची तुफान गर्दी

**दै.रायगड नगरी । ठाणे**

मुंब्रा अपघात प्रकरणात अभियंत्यांच्या विरोधात गुन्हे दाखल केले होते त्याच्या निषेधार्थ रेल्वे कर्मचाऱ्यांनी गुरुवारी ऐन सायंकाळच्यावेळी मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर आंदोलन सुरु केले. या आंदोलनाचा फटका मध्य आणि हार्बर मार्गाला बसला असून रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे.



सीएसएमटी स्थानकावरुन एकही लोकल सोडण्यात आली नसल्यामुळे मध्य रेल्वेवरील सर्व स्थानकांवर प्रवाशांची गर्दी उसळली आहे. ठाणे स्थानकवरील फलाट क्रमांक १, २,३ आणि ५ वर प्रवाशांची मोठी गर्दी उसळल्याचे चित्र आहे. ऐन घरी जाण्याच्या वेळी रेल्वेचा असा गोंधळ झाल्यामुळे नोकरदार वर्गामधून संताप व्यक्त केला जात आहे.

मध्य रेल्वेचे ठाणे स्थानक हे महत्त्वाचे स्थानक आहे. ठाणे स्थानकातून दररोज लाखोच्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. मुंबई तसेच ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली, कल्याण,उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, कर्जत अशा विविध भागातील नागरिक नोकरीनिमित्त ठाण्यात येत असतात.

त्यामुळे सायंकाळच्यावेळी कल्याण, कर्जत - कसाऱ्याकडे जाणाऱ्या गाड्यांना मोठी गर्दी असते.

ऐन गुरुवारी सायंकाळी ५.४५ च्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर रेल्वे कर्मचारी आणि मोटमरन यांनी आंदोलन सुरु केले. या आंदोलनामुळे लोकल गाड्या एकाच ठिकाणी उभ्या होत्या. जवळपास एक तास हे आंदोलन सुरु होते. त्यानंतर, आंदोलन मागे घेण्यात आले. परंतू, तो पर्यंत मध्य रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. ऑफिस संपवून घरी जाण्याच्या तयारीत असलेल्या या नोकरदार वर्गाला या आंदोलनाचा फटका बसला.

रेल्वे सेवा विस्कळीत झाल्यामुळे मध्य रेल्वे स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी उसळलेली आहे. मध्य रेल्वेचे महत्त्वाचे असलेले ठाणे स्थानकात देखील प्रवाशांची मोठी गर्दी झाली आहे. ठाणे स्थानकातील फलाट क्रमांक १, २,३ आणि ५ वर प्रवाशांची मोठी गर्दी उसळल्याचे चित्र आहे. याप्रकारावरुन प्रवासी वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे.

## लोकल रेल्वेने चार प्रवाशांना उडवले, २ ठार

रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे मुंबईतील लोकल रेल्वे सेवा विस्कळीत झाली. त्यामुळे लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. लोकल बंद असल्याने लोक रेल्वे रुळावरूनच चालत जात होते. याचवेळी पाठीमागून आलेल्या लोकलने चार प्रवाशांना उडवले. यात दोन जणांचा मृत्यू झाला. यातील दोघांवर उपचार सुरू आहेत. मध्य रेल्वेच्या मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडली. याच काळात काही प्रवाशी रेल्वे रुळावरून चालत निघाले होते. दरम्यान, रेल्वे सेवा पूर्ववत सुरू झाली आणि छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकातून रवाना झालेल्या पहिल्या लोकलने रुळावरून चालत निघालेल्या चौघांना उडवले.

# अधिराज टॉवरच्या ५१ व्या मजल्यावर लागली भीषण आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर, सेक्टर ३६ येथील ५५ मजली 'अधिराज कॅपिटल सिटी' टॉवरमध्ये रात्री ५१ व्या मजल्यावरील एका बंद अपार्टमेंटमध्ये भीषण आग लागण्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, कारण इमारतीतील रहिवाशांनी तात्काळ आपत्कालीन मार्गाचा वापर करून सुरक्षित स्थळी स्थलांतर केले होते. मात्र, पनवेल परिसरात वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे परिसरातील आगीचे हे सत्र सुरूच असल्याचे चित्र यानिमित्ताने पुन्हा एकदा समोर आले आहे.

रात्री ११.२४ वाजता खारघर अग्निशमन दलाला अधिराज टॉवरमध्ये आग लागल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन बंब आणि पाण्याचे टँकर घेऊन तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

आगीची तीव्रता जास्त असल्याने काळंबोली अग्निशमन दलाच्या पथकालाही तातडीने मदतीसाठी पाचारण करण्यात आले. पनवेलचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंद असलेल्या ५१ व्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये शॉर्ट-सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

टॉवरची उंची जास्त असल्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना आग विझवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले. अग्निशमन दलाच्या एका पथकाने पायऱ्या चढून थेट ५१व्या मजल्यावर प्रवेश केला, तर दुसऱ्या पथकाने लिफ्टचा वापर ४८ व्या मजल्यापर्यंत करून, त्यानंतर पायऱ्या चढून ५१व्या मजल्यावर आग विझवण्याची मोहीम सुरू केली. अग्निशमन दलाच्या जवानांनी सुमारे तीन तास केलेल्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. मात्र, या दुर्घटनेत ५१ व्या मजल्यावरील फ्लॅट पूर्णपणे जळून खाक झाला.

# मसूदची आता महिला दहशतवादी ब्रिगेड

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारताने पाकिस्तानात घुसून पाकिस्तानी अतिरेक्यांचे कंबरडे मोडल्यामुळे आणि 'जैश-ए-मोहम्मद' या अतिरेकी संघटनेचे तीन तेरा वाजवल्यामुळे या संघटनेचा म्होरक्या मसूद अजहरच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे.

या ऑपरेशनचं आणखी एक महत्त्व म्हणजे या मोहिमेत भारतीय लष्कराच्या लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी आणि भारतीय वायुसेनेच्या विंग कमांडर व्योमिका सिंह यांचाही त्यात सहभाग होता. या मोहिमेची सारी माहिती पत्रकार परिषदेद्वारे त्यांनीच दिली होती. यामुळेही मसूद अजहरच्या नाकाला मिरच्या झोंबल्या आहेत. या साऱ्या प्रकरणातून 'धडा' घेतल्यामुळे मसूद अजहरनं आता पाकिस्तानच्या प्रत्येक जिल्ह्यात महिला दहशतवादी आणि त्यांचं केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जैश-ए-मोहम्मदतर्फे महिलांना दहशतवादचं प्रशिक्षणही दिलं जाणार आहे. पाकिस्तानातील अधिकाधिक महिलांनी दहशतवादाकडे वळावं यासाठी त्यानं महिलांना प्रलोभनही दाखवलं आहे. त्याचं म्हणणं आहे, ज्या पाकिस्तानी महिला दहशतवादी केंद्राच्या सदस्य बनतील आणि शस्त्रं हातात घेतील त्यांना 'जन्नत' मिळेल. मसूद अजहरच्या योजनेनुसार पाकिस्तानात आता प्रत्येक जिल्ह्यात महिला दहशतवादाचं एक केंद्र असेल आणि या केंद्राची एक प्रमुख असेल. स्थानिक महिलांना या दहशतवादी केंद्रात महिलांना भरती करण्याचे अधिकार या महिला प्रमुखाकडे असेल. त्यासाठीचे नियमही अतिशय कडक असतील. या 'ब्रिगेड'मध्ये सामील महिलांनी फोन किंवा मेसेंजरवर कोणत्याही अनोळखी पुरुषाशी बोलायचं नाही, असा नियम आहे. पुरुष आणि महिला लढवय्ये एकत्र काम करतील आणि संपूर्ण जगात इस्लाम पसरवतील, अशी मसूदची योजना आहे. मसूद अजहरनं त्यासाठी २१ मिनिटांचा ऑडिओ जारी केला आहे. त्यात महिलांची भरती, ट्रेनिंग आणि 'ग्लोबल जिहाद'साठी त्यांचा वापर करण्याचा संपूर्ण प्लॅन स्पष्ट केला आहे. या युनिटचं नेतृत्व मसूदची बहीण सादिया अजहर करत आहे. सादियाचा नवरा युसूफ अजहर ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरदरम्यान ठार झाला होता. भारतानं ऑपरेशन सिंदूरदरम्यान बहावलपूरमधल्या एका दहशतवादी केंद्राला लक्ष्य केलं होतं, जिथे अनेक दहशतवादी लपलेले होते. अजहरच्या म्हणण्याप्रमाणे पुरुषांसाठी जसा 'दौरा-ए-तरबियत' कोर्स असतो, तसंच महिलांसाठी पहिला कोर्स 'दौरा-ए-तस्किया' असेल. बहावलपूरच्या केंद्रात महिलांना दहशतवादाचं आणि इतर प्रशिक्षण दिलं जाईल. दुसरा टप्पा 'दौरा-आयत-उल-निसाह' असेल, ज्यात महिलांना जिहाद करण्याची पद्धत शिकवली जाईल. हा कोर्स गेल्या २० वर्षांपासून पुरुषांना जिहादसाठी तयार करतो, ज्यात भारताविरुद्ध लढून मृत्यू आल्यास जन्नत मिळण्याचं आश्वासन दिलं जातं. आता महिलांनाही हेच शिकवलं जाणार आहे. 'आयसिस' आणि 'बोको हराम'सारख्या संघटना महिलांचा वापर आत्मघाती हल्ल्यांसाठी करतात, पण जैश ए मोहम्मद, लष्कर आणि हिजबुलसारख्या संघटनांनी याआधी असं केलं नव्हतं. पण मसूदला आताच 'महिला दहशतवादी' तयार करण्याचं सुचलं, याचं कारण 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये असलेला महिलांचा सहभाग!

# त्रिपुरारी पौर्णिमा निमित्त भैरवनाथ यात्रेत डोलकाठीचा थरार

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील किरवली, हालीवली, वांजळे आदी गावांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमा यात्रा स्वरूपात साजरी करण्यात येते. यंदा किरवली येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथाची यात्रा उत्साहात पार पडली. किरवली - देऊळवाडी येथे देवाची डोलकाठी नाचविली जाते. यंदा सुद्धा तरुण ग्रामस्थांनी ही डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर, हातावर ठेऊन नाचविली. हा थरार पहाण्यासाठी भाविकांनी गर्दी केली जाते. नवसाला पावणाऱ्या या दैवताचे दर्शन कर्जत शहरातील भाविकांबरोबरच परिसरातील भाविकांनीही मोठ्या संख्येने घेतले.

देऊळवाडी - किरवली येथील श्री भैरवनाथ मंदिराच्या परिसरात नवसाला पावणाऱ्या व परिसराचे रक्षण करणाऱ्या श्री भैरवनाथाची यात्रा पहाटे साडेचार वाजता काकड आरतीने सुरु झाली. त्यानंतर परिसरातील श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळाचे संगीत भजन झाले. परंपरेनुसार या डोलकाठीच्या टोकाला ढाक येथील चढण्या - उतरण्यास अत्यंत कठीण असलेल्या ढाक - भैरी मंदिरातून ट्रस्टचे सचिव दिलीप बडेकर यांच्या नेतृत्वाखाली आणलेला गरुड ध्वज आणला आणि काठीच्या तुऱ्यावर बांधला. या डोलकाठीची पुजारी प्रकाशबुवा बडेकर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष किसन बडेकर उपस्थित होते. त्यानंतर डोलकाठीचा मोर पिसाऱ्याने शिवमंदिरातील शिवपिंडीला आरतीच्या वेळी वारा घालून ही तीस फुट उंचीची वजनी डोलकाठी हनुवटीवर, दातांवर, कपाळावर व हातावर ठेऊन संकेत बडेकर, दीपक आंग्रे, सौरभ बडेकर, वैभव थोरवे, सुयोग गायकर, ओमकार बडेकर, दीपक आंग्रे, निखिल पन्हाळे, विनीत शेलार, पप्पू पाटील, विनायक बडेकर, प्रसाद बडेकर आदींनी नाचवित नेली. ही वजनी डोलकाठी नाचविण्यासाठी ताकदीची गरज नसते तर अनुभवाची आवश्यकता असते.

डोलकाठी नाचवीत नाचवीत देऊळवाडी, पुलाचीवाडी, बोरवाडी, किरवली येथे नेण्यात आली. त्या पाठोपाठ श्री भैरवनाथाची पालखी सावळाराम बडेकर,आणि अंकुशबुवा बडेकर, किशोर बडेकर, वासुदेव महाराज बडेकर, विजय पन्हाळे, भरत थोरवे, निखिल पन्हाळे, गजानन बडेकर यांनी उचलली. त्यानंतर पुंडलिकबुवा बडेकर यांच्या नेतृत्वाखाली मनोहर शिंदे, बाळूबुवा बडेकर आदींच्या भजनी संगीतासह मिरवणुकीने नेण्यात आली. प्रत्येक घरी पालखीत असलेल्या अश्वारूढ श्री भैरवनाथाच्या मूर्तीची मनोभावी आरती व पूजा करण्यात आली. दिवेलागणीच्या सुमारास सुवासिनींनी उकडलेल्या पिठाचे दिवे सुपातून उडविले. पूर्वी हे दिवे घेण्यासाठी एकच झुंबड असे. ते खाण्यात वेगळीच मजा येत होती परंतु कालानुरूप त्यात बदल झाला असून हल्ली उडविलेले दिवे उचलण्यासाठी मुले येत नाहीत. श्री भैरवनाथाचे दर्शन घेण्यासाठी व नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी होती. पुत्रप्राप्ती साठी केलेला नवस बालकांचा गुळाची तुला करून करण्यात येत होता. नवजात बालकांना सुधा श्री भैरवनाथाच्या पायाशी ठेऊन दर्शन घेण्यासाठी सुद्धा गर्दी होती. एकंदरीत त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.



# उरण - बेलापूर रेल्वे मार्गावरील प्रवाशांना लवकरच मिळणार दुहेरी भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

मध्य रेल्वेच्या बेलापूर-उरण रेल्वेमार्गावरील प्रवाशांना आता दुहेरी भेट मिळणार आहे. रेल्वे प्रशासनाने या मार्गावर १० फेऱ्या वाढवण्याचे नियोजन पूर्ण केले आहे. त्याच बरोबर तरघर आणि गव्हाण या दोन रेल्वे स्थानकांची कामेदेखील पूर्ण झाली आहेत. फेऱ्या वाढीसह नवी स्थानके याच महिन्यात सुरू करण्याच्या हालचाली मध्य रेल्वेकडून सुरू झाल्या आहेत. नवी मुंबई विमानतळाच्या जवळ तरघर रेल्वे स्थानक असल्याने त्याचा फायदा प्रवासी आणि विमानतळ कर्मचाऱ्यांना होणार आहे.

मध्य रेल्वेच्या मुख्य, हार्बर, ट्रान्स हार्बरच्या तुलनेत सीवूड बेलापूर-उरण मार्गावर लोकल फेऱ्या अत्यंत कमी आहेत. उरण मार्गावर प्रवासी संख्या वाढत असतानाही, लोकल फेऱ्या वाढवण्यात आलेल्या नाहीत. उरण मार्गावर दीड तासाच्या अंतराने लोकल उपलब्ध आहे. यामुळे लोकल फेऱ्या वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात आली होती.यासंदर्भात उरणचे आमदार महेश बालदी यांनी राज्याचे मुख्यमंत्री व केंद्रीय रेल्वेमंत्री यांची भेट घेऊन सातत्याने पाठपुरावा केला आहे. सीवूड-बेलापूर-उरण मार्गावर पाच अप आणि पाच डाउन लोकल फेऱ्या वाढवण्यात येणार आहे. त्याचे नियोजन पूर्ण झाले आहे.

यासह तरघर आणि गव्हाण ही दोन स्थानकेदेखील सुरू करण्यात येणार आहेत. दोन्ही रेल्वे स्थानकांतील कामे पूर्ण झाली आहेत. याच महिन्यात लोकल फेऱ्या आणि स्थानके एकाचवेळी खुली करण्यात येणार आहेत, असे रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

उरण- सीवूड -बेलापूर मार्गावर सुरुवातीला १० अप आणि १० डाउन लोकल फेऱ्या वाढवण्याचे नियोजन होते. मात्र प्रवासी तिकीट विक्री आणि प्रवासी संख्या लक्षात घेता एकूण १० लोकल फेऱ्या वाढवण्यावर एकमत झाले आहे. यामुळे उरण मार्गावरील एकूण फेऱ्यांची संख्या ४० वरून ५० वर पोहोचेल. वाढीव फेऱ्यांमुळे दोन फेऱ्यांमधील अंतर कमी होण्यास मदत होणार आहे, असे ही रेल्वे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.



# हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश देणारा - हजरत पीर शेहेनशा वली उरूस उत्सव जल्लोषात साजरा!

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रेवदंड्यातील हजरत पीर शेहेनशा वली यांच्या पवित्र दर्ग्यात बुधवार (दि. ५ नोव्हेंबर) पारंपरिक उरूस उत्सव भक्ती, आनंद आणि सौहार्दाच्या वातावरणात जल्लोषात साजरा झाला. तब्बल १५० वर्षांपासून अविरत सुरू असलेली ही धार्मिक परंपरा आजही तितक्याच श्रद्धा, उत्साह आणि एकतेच्या भावनेने उजळून निघत आहे.

या उत्सवाचे अध्यक्ष आसिफ गोंडेकर यांनी आपल्या मित्रमंडळासह उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रमाचे सुरळीत आयोजन केले. या प्रसंगी हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन दर्ग्यात चादर अर्पण करत धर्मसौहार्द, ऐक्य आणि बंधुत्वाचा संदेश दिला.

संध्याकाळी पारंपरिक संदल मिरवणूक आणि चादर चढविण्याचा सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. त्यानंतर रंगलेल्या कव्वालीच्या मैफलीने वातावरण अधिकच आध्यात्मिक आणि सुरेल बनले. उपस्थितांनी तालावर टाळ्या वाजवत या भक्तिमय संगीताचा आस्वाद घेतला.

उत्सवाचे समन्वय आणि व्यवस्थापन आसिफ गोंडेकर आणि मित्रमंडळाने अत्यंत यशस्वीपणे पार पाडले. कार्यक्रमाच्या यशात इक्बाल फटाकरे, सलीम गोंडेकर, हानिफ गोंडेकर, मुजफ्फर मुकादम, सलीम तांडेल, सुहास घोणे, राहुल गणपत, सुजय घरत, दिपक वैद्य, प्रथमेश कोळसेकर, सचिन पवार आदींचा मोलाचा सहभाग होता.

या प्रसंगी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रायगड जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य वामन चुनेकर, चौल ग्रामपंचायत उपसरपंच अजित गुरव, शाखाप्रमुख राजेंद्र गुरव, सदस्य राजेंद्र वाडकर, संदिप खोत, निलेश खोत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उरूस उत्सवाच्या निमित्ताने रेवदंड्यात धर्मनिरपेक्षतेचा आणि सामाजिक ऐक्याचा उज्वल संदेश पुन्हा एकदा झळाळून दिसला. श्रद्धा, संस्कृती आणि सामंजस्य यांचा सुंदर मिलाफ घडवणारा हा उत्सव, रेवदंड्याच्या धार्मिक परंपरेचा आणि समाजबंधुतेचा अभिमानास्पद सोहळा ठरला.



# म्हसळा शहरात उनाड गुरांचा सुळसुळाट; नागरिकांना त्रास

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड शहरात गेल्या अनेक वर्षांपासून पासून उनाड गुरांचा सुळसुळाट वाढला असून नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

रस्त्यांवर, बाजारपेठांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी गुरांचे मुक्त संचार सुरू असल्याने अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. उनाड गुरांचे मालक शहरातले नागरिक आहेत पण गुरे नजरेत ठेवून नागरिकांना त्रास देत उनाड सोडली असली असल्याचे दिसून येते.असे असताना नगर पंचायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

शहरातील मुख्य रस्ता, बसस्थानक परिसर, तसेच बाजारपेठेत ही गुरे थाटात फिरताना दिसतात.अनेकवेळा ही जनावरे वाहतूक अडवतात, दुकानदारांच्या समोर उभी राहून टाकाऊ पदार्थ खाऊ लागतात तसेच वाहनधारकांना त्रास देतात. रात्रीच्या वेळी या गुरांमुळे अपघातांची देखील नोंद झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार नगर पंचायत प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

शहरातील स्वच्छता मोहीम, वाहतूक व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य या तिन्ही बाबींवर या समस्येचा परिणाम होत आहे. नागरिकांचा सवाल आहे की, नगर पंचायत प्रशासनाने या उनाड गुरांवर नियंत्रण आणण्यासाठी तातडीने मोहिम राबवावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# शतपावलीसाठी घराबाहेर पडलेल्या महिलेच्या अंगावरील सोन्याची चेन खेचून चोरटे पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रात्रीच्या जेवणानंतर शतपावलीसाठी घराबाहेर पडलेल्या महिलेच्या अंगावरील सोन्याची चेन खेचून दुचाकीवरून आलेले चोरटे पसार झाल्याची घटना कामोठे सेक्टर-३६ परिसरात घडली. कामोठे पोलिसांनी या घटनेतील दोघा लुटारूंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

सुजाता वाघमारे (४०) या खारघर, सेक्टर-३६ मध्ये तर त्यांची बहीणही त्याच परिसरात राहतात. सुजाता वाघमारे या कामानिमित्त त्यांच्या बहिणीकडे गेल्या होत्या. जेवल्यानंतर सुजाता वाघमारे या शतपावली करण्यासाठी गेल्या होत्या. त्या सेक्टर-३६ मधील ज्युडिओशेजारील अक्षरकॉन बिल्डिंगजवळ आल्या असताना दुचाकीवरून आलेल्या दोघा लुटारूंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारूने सुजाता वाघमारे यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचली, दरम्यान सुजाता वाघमारे यांनी आरडाओरड केली, मात्र तोपर्यंत हे दोघे लुटारू भरधाव वेगात तेथून पसार झाले. या घटनेनंतर सुजाता वाघमारे यांनी कामोठे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या घटनेतील लुटारू सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असले, तरी त्यांनी आपली ओळख पटू नये यासाठी तोंडाला रुमाल बांधल्याचे आढळले. असे असले तरी या लुटारूंचा इतर मार्गाने शोध घेत असल्याचे पोलिसांनी सांगितले.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**कार्यालय : २७४५८०४०/४१/४२** **फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३**

Email: panvelcorporation@gmail.com

**जा.क्र.पमपा/पापुवि/३९२५/प्र.क्र. ०१/११६१/२५** **दि. ०६/११/२०२५**

### निविदा सुचना

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | PMC/WS/36/ 2025-26 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ३ वर्षाकरिता पिण्याचे पाणी पुरवठा करण्याकरिता टँकर भाड्याने पुरविणे. | रु.१०,४१,९२,०००/- |

वरील ई निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. ०७/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त-१**
**पनवेल महानगरपालिका**



## PUBLIC NOTICE

TAKE NOTICE THAT our client UMANG GUPTA, is intending to buy immovable property situated at village BAGMANDLE , TAL-Shrivardhan, Dist-Raigad, described in the Schedule hereunder written free from all encumbrances. Any person having any claim or right in respect of the said property by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession, possession of original title deeds or encumbrance howsoever or otherwise is hereby required to intimate to the undersigned within 11 days from the date of publication of this notice of his such claim, if any, with all supporting documents failing which the transaction shall be completed without reference to such claim and the claims, if any, of such person shall be treated as waived and not binding on us.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

| S.No. /H.No. | Area H.R. Sq.mtrs/ Assessment Rs.Ps. | Type | Location | Owner |
|---|---|---|---|---|
| 522/2 | 0.91.00 | AGRICULTURAL | BAGMANDLA | CHANDRAKALA KHADE & OTHER 3 |
| 523 | 0.20.00 | AGRICULTURAL | BAGMANDLA | MILIND VASANT KULKARNI |
| 573 | 0.69.60 | AGRICULTURAL | BAGMANDLA | VASANT TUKARAM PENDHARI AND OTHER 5 |
| 509 | 0.75.00 | AGRICULTURAL | BAGMANDLA | MINAL SANJAY KULKARNI |
| 510 | 0.61.00 | AGRICULTURAL | BAGMANDLA | AMIT SHASANK PARANJPE |
| 581 | 0.03.00 | AGRICULTURAL | BAGMANDLA | KISAN GOPAL MAYEKAR AND OTHER 12 |
| 582 | 0.02.00 | AGRICULTURAL | BAGMANDLA | SHEWANTI DASHRATH ADAWADE & OTHER 9 |

Place : MAHAD
Dated : 07/11/2025

**SD/-**
**For any objections, please contact:**
**ADV. SWARAJ AMOL KAREKAR**
**Mo. 9145115558**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# १४ वर्षीय मुलीवर अत्याचार प्रकरणात तरुणाला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे भागातील २३ वर्षीय तरुणाने १४ वर्षीय मुलीवर निर्जनस्थळी लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी उलवे पोलिसांनी बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

उलवे परिसरात राहणाऱ्या मुलाची नवरात्रीमध्ये पीडितेशी गरबा खेळताना ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपीने मुलीसोबत मैत्री वाढवली. दोघेही कारमधून शिवमंदिरालगत खाडीकिनारी फिरायला गेले होते. या वेळी तरुणाने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केला.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that, my client intends to Purchase the below mentioned from the below mentioned land owner with all their shares, rights, title and interest of land property described in the schedule hereunder written. The land location at Post: Akulwadi, Post. Gulsunde, Taluka Panvel, District - Raigad -410207.

All persons having rights, title, benefits, interest, share, claim or demand in respect of the below mentioned property and or any part/s thereof by way of sale, transfer, exchange, lease, sub lease, assignment, Mortgage, Charge, lien, inheritance, bequest, succession, gift maintenance, easement, trust, tenancy, sub tenancy, leave and license, care takers basis, occupation, possession, family arrangement/ settlement, decree or order of any court of law, contracts /agreements or otherwise howsoever are hereby required to make the same the same known in writing along with documentary evidence, to the undersigned. within 14 days from the date hereof, failing which such claims, if any shall be deemed to have been waived.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

| Village | Survey No. & Hissa No. | Area H-R-Sq., Mtrs | Aakar | Owner Name |
|---|---|---|---|---|
| Mauje : Akulwadi Post. Gulsunde Tal.Panvel Dist.Raigad | 111/2 | Total area 0.68.70 Out of total area we interested in 0.53.10 | 10.56 | Mr. Chandaram B. Choudhari Mr. Yogesh D. Choudhari Mr. Dhanaram H. Choudhari Mr. Amrchand B. Choudhari Mr. Ratan T. Choudhari |
| | Total Area | 0.53.10 | | |

Date: 07/11/2025
Place: Panvel

Sd/-
**Adv. Tanuja N. Lomate**
**(Advocate of High Court)**
**(B. Com., LLM. DCL, ADR)**
**Off Add: Shop No. 05, Aayushi Pride C. H. S. Ltd., Plot No. 69, Sector-04, Karanjade, Taluka Panvel, District Raigad-410206.**

# खारेपाट पाणी प्रश्नातील आंदोलकांची निर्दोष मुक्तता

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणम मार्फत वाढीव उद्धव शहापाडा पाणीपुरवठा हेटवणे ते शहापाडा व ते वाशी, शिर्कि खारेपाट ही योजना ३८ कोटी निधी २०१७ ला मंजूर होवुन

योजनेच्या कामला २०१७ ला सुरवात झाली. ही योजना १० डिसेंबर २०१९ ला पूर्ण करायची होती परंतु ही योजना प्रशासनाच्या व ठेकेदाराच्या हलगर्जीपणा मुळे काम पूर्ण झाले. नंतर स्थानिकांच्या आंदोलन नंतर २७ डिसेंबर रिटेड्रीग करुन नवीन ठेकेदाराला २२ जुलै २०२२ पर्यन्त काम पूर्ण करण्याचा कालावधीत सुद्धा पूर्ण केले नाही. सदर पाणी पुरवठा विरोधात ७ डिसेंबर रोजी खारेपाट विकास संकल्प संघटने मार्फत अमरण उपोषणास बसले होते. सदर उपोषण १४ डिसेंबर पर्यत सुरु होते तेव्हा त्सि पेण पाणीपुरवठा अधिकारी कोठेकर यांनी लेखी पत्र देवुन २५ डिसेंबर रोजी पाणी पुरवठा वाशी येथील टाकीत सोडण्याचे लेखी आश्वासन दिले होते. परतू आज पर्यतएक महीना होवुन गेला परंतुआज पर्यत काम पूर्ण केले नाही. यामुळे खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण पेण येथील कार्यालयालात जाब विचारण्यासाठी गेलो आसता

सर्व खारेपाट संघटनेचे सदस्य कार्यालयात बसून काम पूर्ण होत नाही तोपर्यंतआम्ही या ठिकाणाहून जाणार नाही. परंतुआमच्या सर्व सदस्य नंदा म्हात्रे, राजन झेमसे, प्रकाश माळी,अजीत पाटील, हेमंत पाटील, प्रसाद पाटील, महेंद्र ठाकुर, अभिमन्यू म्हात्रे, प्रितेश माळी यांच्या वर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दिड वर्ष चाललेल्या अलिबाग सत्र न्यायालयात सर्व सदस्यांना निर्दोष मुक्तता करण्यात आली. खारेपाट विकास संकल्प संघटनेकडुन ॲड प्रविण ठाकुर यांनी काम पाहिले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १. श्री मनोहर हसुराम म्हात्रे २. श्री एकनाथ हसुराम म्हात्रे ३. श्री नामदेव हसुराम म्हात्रे ४. कुमारी पायल भालचंद्र म्हात्रे राहणार : ३४५- २, सेंन्ट्रल जेल रोड, सेक्टर ३७, इनामपुरी, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१० यांना सिडको लि, कडून मौजे नोड खारघर, येथील फाईल नं. ४३९ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. तसेच भुधारकापैकी १. श्री मनोहर हसुराम म्हात्रे २. श्री एकनाथ हसुराम म्हात्रे यांनी खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल ३. श्री नामदेव हसुराम म्हात्रे यांच्या नावे विना मोबदला हक्कसोड पत्र दिनांक ०९.१०.२०२५ रोजी पावती क्र. १०८१६ पवल १-८०१६-२०२५ दिनांक ०९.१०.२०२५ दिले आहे. तसेच यापुढे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे मालक श्री नामदेव हसुराम म्हात्रे आणि कुमारी पायल भालचंद्र म्हात्रे हे असतील

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक-४३९ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | भूखंड क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३५ ई | ६८ ए | २९८.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/११/२०२५

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, माझे अशिल धृपदी दिनकर धर्णेकर उर्फे धृपदी आंबो पाटील राहणार : हाऊस नं. ८५, पनवेल माथेरान रोड, हनुमान मंदिर जवळ, केवाले, मोरबे, पनवेल, ४१०२०६ यांना सिडको लि, कडून मौजे नोड खारघर येथील फाईल नं २२८ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेल्या शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन त्याप्रमाणे सदर भूखंडाचा झाला आहे. त्याप्रमाणे माझे अशिल श्री दिनेश नामदेव पवार राहणार : हाऊस नं. २७५, कोपरा गाव, सेक्टर १०, खारघर, रायगड, ४१०२१०, यांनी खालील वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल नं.२२८ खारघर**

| नोड | सेक्टर | भूखंड क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३० | ६६ | ४०.०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/११/२०२५

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

# सोन्याच्या दुकानात चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोन्याच्या दुकानातून ४६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे लहान बाळाच्या हातातील कडे बुरखा घातलेल्या महिलेने चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पनवेल शहरातील मलाबार गोल्ड अँड डायमंड रिचेस ज्वेलर्स आर्केड प्रायव्हेट लिमिटेडमध्ये काळ्या रंगाचा बुरखा परिधान केलेली महिला लहान बाळाच्या हातातील सोन्याचे कडे घेण्यासाठी आली होती. यावेळी सेल्समनने तिच्यासमोर कड्यांचा ट्रे ठेवला. यावेळी त्यातून पसंतीचे कडे शोधत असताना हातचलाखी करून ४.७ ग्राम वजनाचे सोन्याचे कडे हातात लपवून ती बुरख्याच्या खिशात घालून चोरी करून निघून गेली. हा सर्व प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरात दिसून आला आहे.

# गांजा विकणाऱ्याला तळोज्यातून अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा पोलिस ठाणे हद्दीतील पडघे गावाशेजारी गांजाविक्रीसाठी आलेल्या ४० वर्षीय व्यक्तीला तळोजा पोलिसांनी अटक केली. पडघे गावाच्या शेजारी शिवाजी शेवाळे हा हातामध्ये पिशवी घेऊन उभा होता. या वेळी पोलिस शिपाई पाटील यांना शेवाळे याच्यावर संशय आला. या वेळी पिशवीत अमली पदार्थ गांजा असल्याचे समजले. पोलिसांनी तत्काळ ७६ हजारांचा गांजा जप्त केला असून, यप्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that on behalf that my Clients 1) Mr. Sampath Ravi Hegde & 2) Mrs. Vandana Hegde, Jointly holding Flat No. 704, 7th floor, wing-A, in the Building known as "Matru Chhaya CHS Ltd," situated at Plot No. G-60 to G-67, Sector 20, CBD Belapur, Navi Mumbai, Tal. & Dist. Thane. To earlier the property has jointly holding between Mr. Sampath Ravi Hegde & Mother Mrs. Vasanti Ravi Hegde. The 50% Share of mother sold to her Daughter in law Mrs. Vandana Hegde by way of Sale deed. Now the parties Mr. Sampath Ravi Hegde & Mrs. Vandana Hegde closed the loan availed from Karnataka Bank, Belapur Branch & the Bank is handing over the Original property documents to them.

If Vasanti Ravi Hegde, having any claim in the said agreement/properties or any part thereof are hereby required to make the same known to the undersigned at office address given herein below, along with certified copy of the documents pertaining to the claim, within 7 days hereof otherwise any claim arise after the said period, shall be deemed to be waived or abandoned.

Place: Kamothe
Date: 06/11/2025

SD/-
**Adv. Deepa Biju**
**Shop No.02, Kohinoor Paradise CHS Ltd., Plot No.53, Sector-12, Kamothe, Navi Mumbai-410206**

ॲड. स्वप्निल अरविंद उपाध्ये पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३३६/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२५/११/२०२५

१) कवलप्रीत कौर जोगिंदर सिंग आनंद
वय ६३ वर्षे, व्यवसाय गृहिणी,
२) सुखमीन कौर जोगिंदर सिंग आनंद
वय ३२ वर्षे, व्यवसाय गृहिणी,
रा. प्लॉट क्रं. ३३, ५२ बंगला, पनवेल को.हौ.सो.,
स्वामी नारायण मंदिराजवळ, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.
तात्पुरते वास्तव्य १५०, पहिला मजला,
शहीद भगत सिंग सोसायटी, ए. जी. लिंग मार्ग,
जे. बी. नगर, अंधेरी (पु.), मुंबई ४०००५९ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं. १ यांचे पती व अर्जदार क्रं. २ यांचे वडील कै. जोगिंदर सिंग अवतार सिंग आनंद यांचे निधन कोकिलाबेन धिरूभाई अंबानी हॉस्पीटल, मुंबई, कै वेस्ट वॉर्ड, ग्रेटर मुंबई, महाराष्ट्र येथे दिनांक ०१/१०/२०२४ रोजी झाले आहे. कै. जोगिंदर सिंग अवतार सिंग आनंद यांना हिंदु वारसा कायद्याप्रमाणे नमुद अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. कवलप्रीत कौर जोगिंदर सिंग आनंद व सुखमीन कौर जोगिंदर सिंग आनंद हयांनी कै. जोगिंदर सिंग अवतार सिंग आनंद यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. कै. जोगिंदर सिंग अवतार सिंग आनंद यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**

गाव : पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे क्रं. ४७२/१, ४७२/२, ७४८/२, ७६४/१ए+बी+सी, ७६५/१, ७४६/२अ१ आणि ७६६ (भाग) वरील, पनवेल सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील स्थित प्लॉट कं. ३३, क्षेत्र ३८९ स्केअर यार्ड म्हणजेच ३२५.२४ चौ. मीटर

वर नमुद केल्याप्रमाणे कै. जोगिंदर सिंग अवतार सिंग आनंद यांचे मृत्यूपश्चात त्यांचे मालकीच्या मिळकतींमध्ये नमुद अर्जदार यांचा हिस्सा आहे.

वर नमुद कवलप्रीत कौर जोगिंदर सिंग आनंद व सुखमीन कौर जोगिंदर सिंग आनंद हया कै. जोगिंदर सिंग अवतार सिंग आनंद यांच्या कायदेशिर वारस आहेत, हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट कवलप्रीत कौर जोगिंदर सिंग आनंद व सुखमीन कौर जोगिंदर सिंग आनंद यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. जोगिंदर सिंग अवतार सिंग आनंद यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ५/११/२५ न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मा. बडगुजर सो। यांच्या न्यायालयात
ॲड. वैभव विजय पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायधीश, वरिष्ठ स्तर, यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४२९/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.१६/१२/२०२५

श्री. सुनिल गणपत कामथ,
वय - ६७ वर्षे, धंदा- निवृत्त,
पत्ता: सदनिका क्र. ५/६, दिनप्रभा, भूखंड क्र. ६४/ए,
नविन एस.आय. इ.एस. कॉलेज जवळ, सायन पूर्व,
मुंबई, महाराष्ट्र, पिनकोड - ४०० ०२२. — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतसे या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील मयत गणपत व्यंकट कामथ यांचे दिनांक ०१/१२/२०१५ या दिवशी सदनिका क्र. ५/६, दिनप्रभा, भूखंड क्र. ६४/ए, नविन एस.आय.इ.एस. कॉलेज जवळ, सायन पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, पिनकोड ४०००२२ येथे निधन झाले. मयत गणपत व्यंकट कामथ व श्रीम. गीता सुनिल कामथ यांच्या नावे असलेल्या संयुक्त मिळकतीचा प्रोबेट दाखला मिळणेसाठी अर्ज केला आहे व त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिका हद्दीतील, भूखंड क्र. ११, सेक्टर ०१, सिडको कॉलनी, नविन पनवेल, पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, पिनकोड ४१०२०६.**

| अ. क्र. | पत्ता | क्षेत्र चौ.फुट (चटई क्षेत्र) |
|---|---|---|
| १ | निवासी सदनिका क्र. ३०१, तिसरा मजला, सॅफ्रन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित | एकूण १,०३३ |

मयत गणपत व्यंकट कामथ यांनी दिनांक २०/०९/२००४ या दिवशी शेवटचे मृत्यूपत्र लिहीले होते व त्या मध्ये मृत्यूपत्राचे निष्प-ादक अर्जदार श्री. सुनिल गणपत कामथ यांना नेमले आहे. सदरहू मृत्युपत्राप्रमाणे सदरहू संयुक्त मिळकतीच्या उर्वरित हक्कावर मयत गणपत व्यंकट कामथ यांची सून श्रीम. गीता सुनिल कामथ म्हणजेच अर्जदार यांची पत्नी हिचा हक्क व अधिकार राहण्याचा आहे. वरील नमूद हक्कांबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मा. न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मा. न्यायालय श्री. सुनिल गणपत कामथ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर मयत गणपत व्यंकट कामथ यांच्या प्रोबेट दाखल्यास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना प्रोबेट दाखला मंजूर करेल.

आज दिनांक ४/११/२५ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

ॲड. सुचिता सत्यवान पाटील
अर्जदार तर्फे वकिल

## जाहीर नोटीस

पनवेल येथिल मे. सिव्हील जज्ज (सि.डी) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३८०/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.१२/१२/२०२५

कै.मंगला गंगाधर आगरकर (मयत) चे वारस
१) श्री. श्रीनीवास गंगाधर आगरकर
वय-६८, धंदा - व्यवसाय
रा.फ्लॅट नं.१/२०३, निलकंठ धारा, आधारवाडी रोड,
सुभाष नगरच्या समोर, कल्याण (वे), ठाणे ४२१३०१
२) श्रीम. मंजुषा चंद्रमोहन आगरकर
वय ७५, धंदा - घरकाम
रा.०४/०२, निळकंठ पार्क, फेज-१,
कल्याण मुरबाड रोड, रिटा मेमोरियल शाळेसमोर,
खडकपाडा, कल्याण (प), ठाणे ४२१३०१ — अर्जदार

ह्या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस असे कळविणेत येते की, कै. मंगला गंगाधर आगरकर हया दिनांक ०२/११/२००० रोजी मौजे -डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पीटल, कल्याण (वे) जि ठाणे येथे मयत झाल्या असून त्यांना अर्जदार १) श्री. श्रीनीवास गंगाधर आगरकर रा. फ्लॅट नं.१/२०३, निलकंठ धारा, आधारवाडी रोड, सुभाष नगरच्या समोर, कल्याण (वे), ठाणे ४२१३०१,२) श्रीम. मंजुषा चंद्रमोहन आगरकर रा.०४/०२, निळकंठ पार्क, फेज-१, कल्याण मुरबाड रोड, रिटा मेमोरियल शाळेसमोर, खडकपाडा, कल्याण (प), ठाणे ४२१३०१ हे वारसदार आहेत. कै. मंगला गंगाधर आगरकर त्यांचे मृत्युसमयी त्यांचे नावे खाली वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांचे नावे होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**ता. पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| लोणिवली | १५१ | ६ | ०-७-६० | ०.१६ |
| लोणिवली | १६७ | ४ | ०-१०-६० | ०.४७ |
| लोणिवली | १४१ | ५ | ०-६-० | ०.२५ |
| लोणिवली | १६१ | ५ | ०-१-५० | ०.१२ |
| बेलवली | ४२ | १ | ०-५-६० | ०.९४ |
| बेलवली | १६७ | १ | ०-१-३० | ०.१२ |

येणेप्रमाणे मिळकती असुन सदरहू मिळकतीच्या ७/१२ सदर कै. मंगला गंगाधर आगरकर यांच्या वारसांची नोंद करण्याकामी अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयांत अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब कै. मंगला गंगाधर आगरकर यांच्या वारसाहक्कासंबंधित अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधीत व्यक्तिंनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ३० दिवसांच्या आंत लेखी हरकती स्वतः अगर वकिलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत अन्य कोणाची हरकत वगैरे न आल्यास आणि अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदारांच्या लाभांत वारसदाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज ता. ५/११/२०२५ रोजी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

ॲड. सुचिता सत्यवान पाटील
अर्जदार तर्फे वकिल

## जाहीर नोटीस

पनवेल येथिल मे. सिव्हील जज्ज (सि.डी) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४५१/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.१२/१२/२०२५

कै. पुरुषोत्तम मुकुंद घांग्रेकर (मयत) चे वारस
१) श्रीम. शुभदा दत्तात्रय शिंत्रे
वय-७७ धंदा - घरकाम
रा. रुम नं. १ आगलावे लेन, गांधी चौक,
कल्याण (प) ठाणे, ४२१३०१
२) श्रीम. मेधा शरद खरे
वय-७५ धंदा - घरकाम
रा.श्री कृपा प्रसादको. ऑप. हौ. सो.
शिवाजी पथ नं.२, चर्च जवळ, गणेश नगर,
विष्णु नगर डोंबीवली (वेस्ट), कल्याण, ठाणे ४२१२०२
३) श्रीम. निलम नंदकुमार केळकर
वय-६९ धंदा - घरकाम
रा. फ्लॅट नं.३०२, नव उत्कर्ष विदयामंदीर रोड,
टिळक नगर, डोंबीवली ईस्ट, कल्याण ठाणे ४२१२०१ — अर्जदार

ह्या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस असे कळविणेत येते की, कै. पुरुषोत्तम मुकुंद घांग्रेकर हे दिनांक ०६/०७/२००५ रोजी मौजे -इंदिरा हॉस्पीटल, कल्याण (वे) जि ठाणे येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार १) श्रीम. शुभदा दत्तात्रय शिंत्रे, रा.रुम नं.१ आगलावे लेन, गांधी चौक, कल्याण (प) ठाणे, ४२१३०१,२) श्रीम. मेधा शरद खरे, रा.श्री कृपा प्रसाद को.ऑप. हौ.सो. शिवाजी पथ नं.२, चर्च जवळ, गणेश नगर, विष्णु नगर डोंबीवली (वेस्ट), कल्याण, ठाणे ४२१२०२,३) श्रीम. निलम नंदकुमार केळकर, रा. फ्लॅट नं.३०२, नव उत्कर्ष विदयामंदीर रोड, टिळक नगर, डोंबीवली ईस्ट, कल्याण ठाणे ४२१२०१ हे वारसदार आहेत. कै. पुरुषोत्तम मुकुंद घांग्रेकर त्यांचे मृत्युसमयी त्यांचे नावे खाली वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांचे नावे होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**ता. पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| लोणिवली | १५१ | ६ | ०-७-६० | ०.१६ |
| लोणिवली | १६७ | ४ | ०-१०-६० | ०.४७ |
| लोणिवली | १४१ | ५ | ०-६-० | ०.२५ |
| लोणिवली | १६१ | ५ | ०-१-५० | ०.१२ |
| बेलवली | ४२ | १ | ०-५-६० | ०.९४ |
| बेलवली | १६७ | १ | ०-१-३० | ०.१२ |

येणेप्रमाणे मिळकती असुन सदरहू मिळकतीच्या ७/१२ सदर कै. पुरुषोत्तम मुकुंद घांग्रेकर यांच्या वारसांची नोंद करण्याकामी अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयांत अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब कै. पुरुषोत्तम मुकुंद घांग्रेकर यांच्या वारसाहक्कासंबंधित अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधीत व्यक्तिंनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ३० दिवसांच्या आंत लेखी हरकती स्वतः अगर वकिलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत अन्य कोणाची हरकत वगैरे न आल्यास आणि अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदारांच्या लाभांत वारसदाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज ता. ५/११/२०२५ रोजी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# थंड हवेच्या माथेरानमध्ये निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष कार्यकर्त्यांमध्ये तप्तता

**दै.रायगड नगरी | माथेरान**

माथेरान मध्ये नगरपालिका निवडणुकांचा ज्वर हळूहळू चढू लागला असून जनतेमधून नगराध्यक्षाची निवड असल्याने नगरसेवक पदासाठी महत्त्व कमी झाल्या असून कोण बनणार नगराध्यक्ष यांच्या चर्चा आता घरोघरी रंगू लागली आहे यामध्ये प्रस्थापित राजकीय पक्षांना या निवडणुकीमध्ये धक्का बसण्याची शक्यता अधिक वाढवली जात आहे.



नगरपालिका निवडणूक म्हणजे आर्थिक घोडा बाजार हे समीकरण आता झाले असून मतदारांच्या ही अंगवळणी पडू लागले आहे कारण नगरपालिकेमध्ये मतदार ही मतदान करताना आर्थिक फायदा बघत असल्याच्या घटना मागील काही निवडणुकांमधून दिसून आल्या आहेत याबाबत अधिक माहिती घेतली असता नगरपालिकेमध्ये जाणारे बहुतांश प्रतिनिधी वैयक्तिक फायद्यासाठी कोणतीही तडजोड करण्यासाठी तत्पर असल्याने मतदारांमध्ये हे नगर-सेवक निवडून देण्याबाबत जास्त सारस्व नसल्याचे दिसून आले आहे परंतु नगराध्यक्ष पदासाठी मात्र योग्य उमेदवार असावा यासाठी सर्वजण आग्रही आहेत त्यामुळेच माथेरान मधील या वेळची नगराध्यक्ष पदाची उमेदवारी कोणाला मिळणार याबद्दल सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटा कडून माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांनी स्वतःची उमेदवारी जाहीर केली आहे ही आपली शेवटची निवडणूक अशी भावनात्मक घोषणाही करण्यास ते विसरले नाहीत तर समोर कोण असणार याबाबतचे चित्र अद्यापही अस्पष्ट आहे शिवसेना शिंदे गटाकडून माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर आग्रही आहेत, शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांनीही या पदाकरता शड्डू ठोकल्याने मोठा पेज प्रसंग वरिष्ठासमोर उभा राहिला आहे. उमेदवारी जाहीर करताना पक्ष फुटणार नाही याचीही काळजी वरिष्ठांना घ्यावी लागणार आहे, भाजपाने मागील पाच वर्षापासून नगराध्यक्ष आमचाच असा नारा दिला असला तरीही प्रबळ दावेदार म्हणून कोणीही समोर येत नसल्याने नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीतून ते जवळपास बाद झाले आहेत .

या पदासाठी खऱ्या घडामोडी या तीन उमेदवारांमध्येच घडणार असल्याने सगळ्यांना उत्सुकता लागून राहिली आहे कारण कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी माथेरान नगरपालिका हा प्रश्न गांभीर्याने घेतला असून चंद्रकांत चौधरी यांच्या उमेदवारीसाठी ते अनुकूल असले तरी मनोज खेडकर यांना त्यांनी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून शब्द दिला होता त्यामुळे यातून कोणाला उमेदवारी मिळणार की तिसरा उमेदवार या वेळेला समोर येईल हे दोन दिवसांमध्ये स्पष्ट होणार आहे कारण यांच्या व्यतिरिक्त अनेकांनी छुप्या पद्धतीने या पदासाठी आपली इच्छा व्यक्त केली आहे तर माथेरान बाहेर सर्वच पक्ष एकमेकांशी संधान बांधून असून गुपचूप रात्रीस खेळ चाले अशा पद्धतीने मीटिंग होत असल्याने मतदार हे संदर्भात आहे कोणत्याही पक्षाला मात्र मध्ये बहुमत नसल्याने एकमेकांचे साथ घेणे गरजेचे आहे परंतु वैयक्तिक हेवेदावे सातत्याने समोर येत असल्याने यामध्ये अडचण ठरत आहे, चाणक्य नीति च वापर करून इच्छुक उमेदवारांच्या प्रतिमा डागळण्याचे काम हे छुप्या पद्धतीने होत असल्याचे नागरिकांना अनुभवायला मिळत आहे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनीही पूर्ण ताकदीनिशी सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक लढविणार असल्याचे सांगितल्याने ही निवडणूक सरळ नसणार हे स्पष्ट झाले असून साम दाम दंड भेद अशा प्रकारचा वापर यावेळी पहिल्यांदाच माथेरान निवडणुकीमध्ये होणार हे आता निश्चित झाले आहे.

दिवाळी पर्यटन हंगाम आता संपुष्टात आल्यामुळे निवडणूक हालचालींना आता वेग येणार असून लवकरच स्पष्ट चित्र नागरिकांसमोर येईल. परंतु सध्याच्या घडामोडी पाहता येथील राजकीय पटलावरील वातावरण सध्या गरम असून फोडाफोडीच्या राजकारणाला अधिक प्राधान्य दिले गेल्यामुळे निष्ठावंत कार्यकर्ता या सर्व प्रक्रियेपासून लांब असून मागील पाच सात वर्षांमध्ये त्यांच्याबरोबर झालेल्या गोष्टींचा हिशोब चुकता करण्याकरता हे सर्व तयार असल्याचे एका कार्यकर्त्यांनी सांगितले.

# ‘वंदे मातरम’ गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त नविन पनवेलमध्ये भव्य समूहगायन कार्यक्रम

## राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती; शरद पोंक्षे करणार ‘वंदे मातरम’ च्या इतिहासावर मार्गदर्शन




**दै.रायगड नगरी | पनवेल**

स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी व शहिदांना वंदन आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार येत असून त्या अनुषंगाने शुक्रवार दिनांक ०७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ०४ वाजता नविन पनवेल मधील के. ए. बांठिया विद्यालय येथे 'वंदे मातरम' समूह गायन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आल्याची माहिती कार्यक्रम प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. तसेच या कार्यक्रमाच्या अनुषंगाने अभिनेते व राष्ट्रविचाराचे प्रसिद्ध व्याख्याते शरद पोंक्षे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितीत राहून वंदे मातरम गीताची पार्श्वभूमी व महत्व यावर मार्गदर्शन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला त्यांच्या समवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नविन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, यतीन पाटील आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमाच्या संदर्भात माहिती देताना पुढे सांगितले कि, भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने वंदे मातरम गीताच्या १५० वर्षांच्या उल्लेखनीय परंपरेचा उत्सव राष्ट्रीयस्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा कार्यकर्ते आणि लोकसहभागातून हा उत्सव व्यापक प्रमाणात साजरा होणार आहे. त्या अनुषंगाने भाजपा देशभरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, सामूहिक वंदे मातरम गायन, देशभक्तीपर रॅली तसेच जनजागृती उपक्रमांचे आयोजन करणार आहे. हे सर्व कार्यक्रम आगामी संविधान दिन (२६ नोव्हेंबर) पर्यंत सतत चालणार आहेत. देशभरात १५० ठिकाणी कार्यक्रम तर महाराष्ट्रात नागपूर, अकोला, ठाणे, रायगड, पुणे, अहिल्यानगर, कराड सातारा, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर या १० ठिकाणी होणार असून रायगड जिल्ह्याचा कार्यक्रम ०७ नोव्हेंबरला नविन पनवेल येथे होणार आहे.

'वंदे मातरम' हे गीत भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील राष्ट्रप्रेम, ऐक्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या लढ्यात या गीताने असंख्य स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा दिली. हे गीत केवळ शब्दांची अभिव्यक्ती नसून, भारतीय जनतेच्या भावविश्वाचे, स्वातंत्र्याच्या उत्कटतेचे आणि मातृभूमीवरील प्रेमाचे प्रतीक आहे. वंदे मातरमच्या इतिहासाची आणि राष्ट्रवादाच्या प्रेरणेची जनसामान्यांना माहिती करुन देणे, युवकांमध्ये देशभक्तीची भावना दृढ करणे, भारतीय संविधानाच्या मूल्यांचा प्रचार व प्रसार आणि त्या अनुषंगाने राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक ऐक्याला बळकटी देणे हे या कार्यक्रमांचे प्रमुख उद्देश आहे. त्यानुसार बांठिया विद्यालय येथे होणाऱ्या या कार्यक्रमात विविध विद्यालयांचे अडीच हजारांहून अधिक विद्यार्थी, विविध संस्था, संघटना, पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असून नागरिकांनीही या महत्वपूर्ण उत्सवात सहभाग घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

# रोहा ग्रामीण भागासह शहरातही पदाधिकाऱ्यांचा आयाराम गयाराम सुरूच

**दै.रायगड नगरी | धाटाव**

सध्या राज्यात सगळीकडे राजकीय अस्थिरता पसरली असून दररोज या पक्षातून त्या पक्षात राजकीय नेते माकड उड्या मारत आहेत.आता नेता कोणत्या पक्षात जाईल,याचा नेम बांधणे कार्यकर्त्यांना मात्र अवघड जात आहे.पक्षनिष्ठा गेल्या काही दिवसात केवळ कागदावरच दिसत असल्याने राजकारणात गोंधळ उडाला आहे. त्यामुळे रोहा तालुक्यातील ग्रामीण भागासह आता शहरात सुद्धा आता याचे लोण पसरत चालल्याने कार्यकर्त्यांना मात्र कोणता झेंडा घेऊ हाती?असा प्रश्न पडला आहे.पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते वेगवेगळ्या पक्षात जात असल्याने रोहा पंचायत समिती बरोबरच जिल्हा परिषदेच्या गटातील निवडणुकांच्या निकालासह नगरपालिकांच्या निवडणुकीचे चित्रही बदलणार असे संकेत जाणवू लागले आहेत.

निवडणूक आयोगाकडून अवघ्या दोन दिवसांपूर्वी राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे,राज्यात नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुका होणार आहेत.मात्र त्यापूर्वी आता पक्षांतराला देखील वेग आल्याचं पहायला मिळत आहे.विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीमधील अनेक दिग्गज नेते आणि पदाधिकाऱ्यांनी महायुतीमध्ये प्रवेश केल्याचं पहायला मिळालं.हे पक्ष प्रवेश अजूनही सुरूच आहेत.ती म्हणजे जसं महाविकास आघाडीमधील नेते आणि पदाधिकारी महायुतीमधील घटक पक्षांमध्ये प्रवेश करीत आहेत,त्याचप्रमाणे आता ऐन निवडणुकीच्या तोंडावर महायुतीचे नेते देखील आपल्या मित्र पक्षांमध्ये प्रवेश करताना दिसत आहेत.

नगरपालिकांच्या निवडणुकीत उमेदवारीसाठी गुढग्याला बाशिंग बाधून असलेल्या तालुक्यासह शहरातील पदाधिकाऱ्यांचाही आयाराम गयाराम सुरूच आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या ताब्यात असलेल्या रोहा नगर पालिकेवर राष्ट्रवादीची हुकूमत आहे.मात्र ही हुकूमत मोडीत काढण्याच्या हेतूने आता महायुतीतील शिवसेना शिंदे गटाच्या तालुका नेतृत्वाने चांगलाच चंग बांधला आहे. त्यातच भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून काही नवख्या उमेदवारांनी सुद्धा या निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे.मात्र काँग्रेस,राष्ट्रवादी शरद पवार गट,शिवसेना उबाठा गट,मनसेसह इतर पक्षाकडूनही आता हळूहळू मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. रोह्यातील ग्रामीण भागातून पक्ष प्रवेशामुळे कार्यकर्ते एकमेकाशी जोडले जात असल्याने गावागावात बैठका सुरू आहेत,तर याचाच परीणाम शहरी भागात होत असल्यामुळे नगरपालिका प्रभागवार उत्सुकांमध्ये गुप्त बैठका होताना दिसत आहेत.वेगवेगळ्या पक्षासाठी मोर्चेबांधणी करणारी मंडळी ही आपआपसातील नातेसंबंधात असल्याने ग्रामीण भागात आणि शहरात एकमेकांना मदत करण्यास सक्रिय झाले असल्याचेही ऐकावयास मिळत आहेत.एकंदरीत विविध पक्षातून पदाधिकाऱ्यांचा आयाराम गयाराम सुरूच असल्यामुळे पुढे येऊ घातलेल्या जि.प.आणि पंचायत समितीच्या निवडणुकी बरोबर नगरपालिका निवडणुकीचेही चित्र बदलणार हे मात्र नक्की असे बोलले जात आहे.

# रायगड जिल्ह्यात ४ हजार १५६ दुबार मतदार; खोपोलीत सर्वाधिक तर माथेरानमध्ये सर्वात कमी दुबार मतदार

**दै.रायगड नगरी | अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम टीव्ही जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर दुबार मतदारांना रोखण्यासाठी निवडणूक विभागाने नियोजन केले आहे. रायगड जिल्ह्यात दहा नगरपालिका क्षेत्रात ४ हजार १५६ दुबार मतदार असल्याचे समोर आले आहे. खोपोली येथे सर्वाधिक तर माथेरान येथे सर्वात कमी दुबार मतदार असल्याचे पडताळणीत समोर आले आहे. दुबार मतदान रोखण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी स्पष्ट केले आहे.

आगामी नगरपरिषद निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर ते जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, नगर पालिका प्रशासन विभागाचे प्रमुख विराज लबडे उपस्थित होते. मतदार यादीत आढळलेल्या दुबार आणि तिबार नावांबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांनी ही प्रक्रिया पूर्ण केल्याचा दावा जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी केला.

राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीतील नावांमध्ये पुनरावृत्ती झालेल्या नोंदी तपासून कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, श्रीवर्धन, मुरुड-जंजीरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत आणि माथेरान या १० नगरपरिषदांनी आपले अहवाल सादर केले आहेत. या अहवालानुसार, एकूण ४ हजार १५६ दुबार किंवा तिबार नावे मतदार यादीत आढळली आहेत. या सर्व नावांपूढे निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार डबर स्टार देण्यात येणार आहेत. त्याच बरोबर या सर्व मतदारांकडून कुठल्या मतदान केंद्रांवर मतदान करणार याबाबतचा अर्ज भरून घेण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. एकही मतदार दोन ठिकाणी मतदान करू शकणार नाही याची दक्षता घेतली जणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यात सर्वाधिक दुबार मतदार हे खोपोलीत आढळले आहेत. खोपोलीत ८९१, अलिबागमध्ये २४४, श्रीवर्धनमध्ये १३१, मुरुड-जंजीरामध्ये ६९, रोह्यात ६२, महाडमध्ये ३५९, पेणमध्ये ७८४, उरणमध्ये ७८१, कर्जतमध्ये ८१७ आणि माथेरानमध्ये १८ दुबार मतदार आढळले आहेत अशी माहिती यावेळी जिल्हाधिकारी यांनी दिली. राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त निर्देशांनुसार नगरपरिषदांच्या मतदार याद्या आगामी निवडणुकीसाठी अद्ययावत करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# शिवसेनेकडून चरइखुर्द ग्रा.पं कार्यालय बांधणीसाठी २० लाख रुपये मंजुर राष्ट्रवादी घेतेय खोटे श्रेय : प्रद्युम्न ठसाळ

**दै.रायगड नगरी | तळा**

ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतून नुकतीच मंजुरी मिळाली आहे यामध्ये तळा तालुक्यातील चरईखुर्द ग्रामपंचायत इमारतीसाठी २० लाख रुपये मंजूर झाले आहेत ही मंजुरी केवळ राज्याचे रोजगार हमी फलोत्पादन खारभुमी विकासमंत्री ना.भरतशेठ गोगावले यांच्यामुळे मिळाली असून राष्ट्रवादी काँग्रेस खोटे श्रेय घेत असल्याचा दावा शिवसेना शिंदे गट तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ यांनी केला आहे तळा शिवसेना शाखेत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी ही माहिती दिली या पत्रकार परिषदेस शहर प्रमुख राकेश वडके,जिल्हा कोअर कमिटी सदस्य लिलाधर खातू,नगरसेवक नरेश सुर्वे,रितेश मुंढे,चरईखुर्द ग्रामपंचायतीचे रहिवाशी विश्वजित शिंदे,दिपक चिंचळकर, सिद्धेश राणे उपस्थित होते.

शिवसेना तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ यांनी सांगितले की, चरइखुर्द ग्रा.पं कार्यालय बांधणीसाठी २० लाख रुपये मंजुर करण्यात आले आहेत त्यासाठी या ग्रामपंचायतीचे रहिवाशी विश्वजित शिंदे आणि येथील ग्रामस्थ सहा महिन्यांपूर्वी आमच्याकडे आले होते त्यांच्या मागणीनुसार ना.भरतशेठ गोगावले यांची भेट घेऊन कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली ना.भरतशेठ गोगावले यांनी राज्याचे ग्रामविकासमंत्री ना.विजयकुमार गोरे यांच्याकडे १८ जुलै २०२४ रोजी या ग्रामपंचायत कार्यालय बांधणीसाठी प्रशासकीय मंजुरी व निधी उपलब्ध करून द्यावा अशी शिफारस केली होती हे शिफारस पत्र त्यांनी यावेळी दाखवले त्यामुळे या पत्रानुसारच चरइखुर्द ग्रा.पं कार्यालय बांधणीसाठी २० लाख रुपये मंजूर झाले असून राष्ट्रवादी काँग्रेसने खोटे श्रेय घेऊन जनतेची दिशाभूल करू नये असे तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ यांनी सांगितले.

चरइखुर्द ग्रामपंचायतीचे रहिवाशी विश्वजित शिंदे यांनी सांगितले की नवीन इमारत बांधण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे ग्रामस्थांनी ना.भरतशेठ गोगावले यांच्याकडे एप्रिल महिन्यात दिली होती त्याचा पाठपुरावा तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ शहर प्रमुख राकेशशेठ वडके,लिलाधर खातू सातत्याने गेली अनेक महिने घेत आहेत त्यामुळे या ग्रामपंचायतसाठी मंजूर झालेले २० लाख रुपये शिवसेनेच्या पाठपुराव्यातून झालेले आहे आणि याचे संपूर्ण श्रेय शिवसेनेचेच आहे याचे श्रेय लाटू ईच्छिणारयांनी पाठपुराव्याचे पुरावे द्यावेत असे आवाहन यावेळी केले. चरइखुर्द ग्रा.पं कार्यालय बांधणीसाठी २० लाख रुपये मंजुरीवरून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात श्रेयवादाची लढाई सुरू झाली आहे सोशल मीडियावर दोन्ही पक्षातील कार्यकर्ते आपापल्या नेत्यांचे अभिनंदन करत आहेत.तळ्यात विकासकामांच्या श्रेयवादावरून शिवसेना-राष्ट्रवादी यांच्यात नेहमीच कलगीतुरा रंगला आहे. पालकमंत्री पदाच्या वादानंत राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्ये सुरू असलेला संघर्ष सातत्याने उघड होऊ लागला आहे.शिवसेनेच्या पत्रकार परिषदे नंतर राष्ट्रवादी काँग्रेस कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.

